# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - ONE


**गुरूवार दिनांक. १६ जुलै, २०१५**

नियम क्रमांक ०३/२०१५

**संत गाडगे बाबा स्मृति कमवा व शिका योजना**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील ५(४०) (एच) ५५(१) आणि ५५(२)(सी) मधील अधिकार व कर्तव्याचे प्रावधानानूसार विद्यापीठाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आवश्यक व शक्य असेल असे सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने आखण्यात आलेले कोणतेही इतर कार्यक्रम, सेवा किंवा उपक्रम यामध्ये सहभागी करण्याची तरतूद उपलब्ध आहे आणि;

**ज्याअर्थी,** विद्यापीठीय शिक्षणाच्या उद्दीष्टांमध्ये विद्यार्थ्याला अध्ययन, अध्यापन व संशोधन एवढ्यापुरते मर्यादित न ठेवता त्याला समाजपयोगी सुसंस्कृत नागरिक घडविणे हे शिक्षणाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक प्रमुख उद्दीष्ट आहे आणि,

**ज्याअर्थी,** विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास केवळ पुस्तकी वा बौध्दिक शिक्षणाने होऊ शकणार नाही. किंबहुना व्यक्तिमत्वाचा विकास हा शरीर, मन, बुध्दी आणि आत्मा या सर्वाच्या संतुलनातून खऱ्या अर्थाने विकसीत होतो. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करूनच उच्च शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यामध्ये श्रम संस्कार व श्रम भावना वृध्दींगत व्हावी व पर्यायाने विद्यार्थ्याने अर्थाजन करून पालकांना व कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासमवेत स्वतःचे श्रमदानाच्या प्राप्त अर्थार्जनातून आवश्यक शिक्षण मिळविण्याचा प्रयत्न करावा ही उद्दिष्ट्ये समोर असून “ कमवा व शिका ” योजना सुरू केल्याने प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल आणि,

**ज्याअर्थी,** सदर योजना विद्यापीठाव्दारे कार्यान्वीत केल्यास विद्यापीठामध्ये अस्तिवात असलेल्या अल्प मनुष्यबळावर निर्माण झालेला अतिरिक्त प्रशासकीय कार्यभार कमी होऊन विद्यापीठ नियमित कर्मचाऱ्यांना कार्य त्वरेने संपादन करण्यात सहयोग होऊ शकेल व पर्यायाने विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज गतीमान करण्याचे उद्दीष्टच सफल होऊ शकेल आणि

**ज्याअर्थी,** दिनांक ०२.०८.२०१४ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेने विषय क्रमांक १६६ अन्वये “ कमवा व शिका ” योजनेचे प्रारूप नियम तयार करण्यास मान्यता प्रदान केली आहे आणि

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र विद्यापीठे कायदा कलम ५५(२) सी मधील तरतुदींतर्गत प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून व्यवस्थापन परिषद खालीलप्रमाणे नियम तयार करीत आहे.

१) **योजनेचे नांव –** या नियमांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ “ संत गाडगेबाबा स्मृती कमवा व शिका” योजना या नावाने संबोधिले जाईल.

२) **योजनेची अंमलबजावणी** - सदर नियम व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केल्याचे तारखेपासून अंमलात येतील.

३) **व्याख्या –** या नियमांमधील उपयोगात आणल्या जाणाऱ्या शब्दांच्या व्याख्या खालीलप्रमाणे राहतील.
विद्यार्थी म्हणजे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालय/संस्था/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय/स्वायत्ता महाविद्यालय येथे नियमीत रित्या पदवी पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमाना प्रवेशित असलेला विद्यार्थी / विद्यार्थीनी.

४) **उद्दिष्ट्ये : या योजनेची उद्दीष्टे खालीलप्रमाणे राहतील.**
अ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण संपादन करण्यासाठी श्रमाच्या मोबदल्यामध्ये प्राधिकारिणीव्दारे निर्धारित श्रम मोबदला प्रदान करणे.
ब) मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे.
क) ज्ञानसेवक निर्माण करणे.
ड) स्वयंरोजगार प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्याला प्रेरित करणे,
ई) विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृतीची जाणीव निर्णाण करणे.

५) **पात्रता :**
सदर योजनेचा लाभ हा जे विद्यार्थी अथवा विद्यार्थीनी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या स्थानिक महाविद्यालये/संस्था/पदव्युत्तर शैक्षणिक विभाग/घटक महाविद्यालय/स्वायत्त महाविद्यालय येथे नियमित रित्या पदवी, पदविका. पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशित असतील त्यांना निर्धारीत पद्धतींचा अवलंब करून घेता येईल.

६) **अर्जाचा नमुना व सादर करावयाची तिथी :**
सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना परिशिष्ट ‘अ’ नुसार अर्ज संचालक, विद्यार्थी कल्याण, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नांवे प्रतिवर्षी दिनांक २१ जुलै पुर्वी सादर करणे अनिवार्य राहील. उपरोक्त नमूद तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. परंतु अपवादात्मक परिस्थितीमध्ये कुलगुरूंचे अनुमतीने अर्ज बोलाविणे अथवा स्विकारणे याचे अधिकार संचालक, विद्यार्थी कल्याण यांना राहतील.

७) **माहीतीचे प्रकाशन :** सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरीता प्रतिवर्षी संचालक, विद्यार्थी कल्याण यांचे कार्यालयामार्फत विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळावर सदर योजनेसंबंधीची माहीती माहे जूनच्या चौथ्या आठवड्यात प्रकाशित करण्यात येईल.

८) **समिती व कालावधी :** परिच्छेद क्रमांक ६ मध्ये नमुद दिनांकानुसार प्राप्त होणाऱ्या अर्जाची छाननी कुलगुरूव्दारे नामित करण्यात येणाऱ्या त्रिसदस्यीय समितीव्दारे करण्यात येईल. सदर समितीमध्ये विद्यापीठातील कार्यरत अधिकाऱ्यांचा समावेश राहील व समितीचा कार्यकाल हा कुलगुरूंनी नामित केल्याच्या दिनांकापासून किमान एक वर्षाचा कालावधी राहील किंवा पुढील समितीचे गठन होई पर्यंतचा राहील.

९) **प्रतिक्षा यादी :** आवश्यकतेपेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास परिच्छेद ८ नुसार गठीत समितीद्वारे विद्यार्थ्यांची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल. तसेच निवड यादीमध्ये त्रिसदस्यीय समितीव्दारे प्रतिक्षा यादी देखिल तयार केली जाईल. सदर यादी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ येथे प्रकाशित करण्यात येईल.

१०) **यादी प्रकाशन व रूजू होण्याचा कालावधी :** निवडण्यात आलेल्या विद्यार्थ्याला / विद्यार्थीनीला निर्धारीत करून देण्यात येणाऱ्या विभागामध्ये यादी प्रकाशनाचे दिवसापासून सात (७) दिवसांचे आत रूजू होणे अनिवार्य राहील. अपवादात्मक परिस्थीतीमध्ये निवड करण्यात आलेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनी विहित कालावधीमध्ये रूजू होण्यास असमर्थ राहिल्यास त्याला रूजू करून घेण्याचे अधिकार उपरोक्त समितीला राहतील.

११) **रिक्त जागा :** निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यापैकी एखादा विद्यार्थी / विद्यार्थीनी कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित अथवा येण्यास इच्छूक नसल्यास प्रतिक्षा यादीमधील अनुक्रमाने अग्रस्थानी असलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता आमंत्रित केले जाईल.

१२) **निवड समितीचा निर्णय :** सदर योजनेचा लाभ प्राप्त होण्याकरीता निवडण्याकरीता गठीत निवड समितीचा निर्णय हा अंतीम राहील व तो मुलाखतीसाठी येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस बंधनकारक राहील.

१३) **निर्णयाधिकार :** सदर निवडीबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना निर्णय देण्याचे अधिकार राहतील. अपिलीय अधिकारी म्हणून मा. कुलगुरू राहतील.

१४) **यादी संग्रहण :** सदर योजनेमध्ये निवड करण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी संचालक, विद्यार्थी कल्याण यांचे विभागामध्ये संग्रहित करण्यात येईल.

१५) **कामाचे स्वरूप :** सदर योजनेमध्ये निवडण्यात येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीला संभाव्यतः खालील कामे सोपविली जातील.

अ) प्रशासकीय कार्ये :
ब) तांत्रिक कार्ये :
क) क्षेत्रिय कामे :

१६) **कामाचा कालावधी :** सदर योजनेमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीला प्रति दिन निर्धारीत वेळेमध्ये किमान पाच (०५) तास कार्य करणे अनिवार्य राहील.

१७) **सुटी काम मोबदला :** निर्धारीत / शासकीय/स्थानिक/ जाहीर करण्यात आलेल्या सुटी कालावधीमध्ये विद्यार्थी/विद्यार्थीनीची निवड ज्या विभागामध्ये कार्य करण्याकरीता झालेली असेल, व सदर कार्यालय बंद राहणार असल्यास त्या दिवशीचा श्रम मोबदला सदर विद्यार्थ्याला देण्यात येणार नाही. तथापि, सदर कार्यालय मात्र सुटीच्या दिवसामध्ये देखिल सुरू राहणार असल्यास व सदर विद्यार्थी / विद्यार्थीनीस त्या दिवशीचे कार्यालयीन काम सोपविण्यात आल्यास त्याचा श्रम मोबदला त्याला/तिला संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांनी प्रमाणित केल्यानुसार दिला जाईल. याकरीता सदर विभागाच्या विभाग प्रमुख/अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१८) **श्रम मोबदला देयेके शिफारशीचे अधिकार :** श्रम मोबदला प्रदान करण्याकरीता परिशिष्ट 'ब' नुसार देयके संबंधित विभागप्रमुखांचे शिफारशीनंतर संचालक, विद्यार्थी कल्याण यांचे विभागास प्राप्त झाल्यानंतर शोधनाचे कार्यवाहीस्तव विद्यार्थी कल्याण विभागामार्फत वित्त विभागाकडे अग्रेषित केली जातील.

१९) **श्रम मोबदला दर व हजेरी पुस्तक :** निवडण्यात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला तो करीत असलेल्या श्रमदानापोटी प्रति दिवस रू २१०/- प्रमाणे वेळोवेळी व्यवस्थापन परिषदेने ठरविलेल्या नियमानुसार मोबदला मासिक हजेरीच्या अनुपातात दिला जाईल. सदर हजेरी विभागवार विभागप्रमुखांनी प्रमाणित केलेली असावी. त्याशिवाय त्याच्या देयकाच्या शोधनाची शिफारस केली जाणार नाही.

२०) **बँक खाते :** विद्यार्थ्याला प्रदान करावयाचा मोबदला विद्यार्थ्याचे रूजू होतेवेळी विद्यार्थ्याने सादर केलेल्या अर्जात नोंदविलेल्या त्याचे स्वतःचे नावे असलेल्या बँक खात्यामध्ये महिण्याचे अखेरीस वित्त विभागामार्फत जमा केला जाईल.

२१) **अनुशासन व तक्रार निवारण :** निवड झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्याने गैरवर्तन, असभ्य वागणूक अथवा कोणत्याही गोपनीयतेचा भंग केल्यास आणि तशा आशयाची लेखी तक्रार संबंधित विभाग प्रमुखामार्फत रितसर प्राप्त झाल्यानंतर त्याची शहानिशा मा. कुलगुरू महोदयांव्दारे गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीमार्फत केली जाईल. तक्रारीमध्ये तथ्यांश आढळून आल्यास सदर विद्यार्थी हा अस्तित्वात असलेल्या नियमानुसार शिक्षेस पात्र असेल. तथापि, असा विद्यार्थी / विद्यार्थीनी व त्याने केलेले सदर कृत्य ज्या स्वरूपाचे असेल त्याप्रमाणे कार्यवाहीचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार कुलसचिवांना राहतील प्रशासकीय / शैक्षणिक विभागांना लागणाऱ्या मनुष्यबळाची आवश्यकता ठरविण्याचे अधिकार सदर समितीला राहील.

२२) **शारीरिक व मानसिक तंदुरूस्ती प्रमाणपत्र :** सदर योजनेंतर्गत निवडण्यात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी / विद्यार्थीनीस शारीरिक व मानसिक तंदुरूस्ती प्रमाणपत्र रूजू होतेवेळी परिशिष्ट 'क' नुसार विद्यार्थी कल्याण विभागामध्ये सादर करणे अनिवार्य राहील.

२३) **पालकांचे संमतीपत्र :** सदर योजनेतर्गत निवडण्यात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी / विद्यार्थीनीस परिशिष्ट 'ड' नुसार पालकांचे संमतीपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

२४) **विद्यार्थी/विद्यार्थीनीस वैयक्तिक कारणास्तव आवश्यक असलेली रजा :** प्राचार्याच्या शिफारसीनुसार निवड करण्यात येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस कोणत्याही वैयक्तिक कारणास्तव रजा घेणे आवश्यक ठरल्यास त्याबाबतचा रितसर अर्ज संबंधीत विभागाच्या विभाग प्रमुखांच्या नावे स्वाक्षरीसह अग्रीम स्वरूपात सादर करावा लागेल.

२५) **विद्यापीठाची चल, अचल मालमत्ता व इतर गोपनीय कागदपत्रे :** निवड होणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस वैयक्तिक कामाकरीता विद्यापीठाच्या चल अचल मालमत्तेचा उपयोग करता येणार नाही. तसेच कोणत्याही प्रकारची वस्तू/सुविधा/दस्तऐवज यांचा वापर संबंधीत विभागाच्या अधिकारी / कर्मचारी यांच्या पूर्व अनुमतीशिवाय करता येणार नाही असे आढळल्यास सदर विद्यार्थी /विद्यार्थीनी हे उपरोक्त परिच्छेद क्र. २१ मधील तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र ठरतील.

*****

परिशिष्ट - 'अ'

संत गाडगेबाबा स्मृती कमवा व शिका योजना
आवेदन पत्र
सादर करावयाची अंतीम तिथी - २१ जुलै -----

प्रति,
मा.प्राचार्य/ प्राचार्या,
--------------------------
--------------------------
--------------------------

विषय : "संत गाडगे बाबा स्मृती कमवा व शिका" योजनेकरीता नावाची शिफारस करण्याबाबत.....
संदर्भ : विद्यापीठ अधिसूचना क्र ------------- दिनांक -------------------

महोदय/ महोदया,

मी -------------------आपल्या महाविद्यालयामध्ये ----------------------या शैक्षणिक सत्रात ---------- या वर्गात प्रवेश घेतला असून उपरोक्त संदर्भाकित अधिसुचनेनुसार कमवा व शिका या योजनेअंतर्गत माझी निवड होण्याकरिता संपूर्ण माहितीसह विहीत नमुन्यातील अर्ज संबंधितांकडे शिफरसीसह अग्रेषित करण्यकरीता सविनय सादर करीत आहे. हि विनंती.

विद्यार्थी / विद्यार्थीनीचे प्राचार्याद्वारे स्वाक्षांकित केलेले छायाचित्र येथे लावावे

| | | |
|---|---|---|
| १. | विद्यार्थी / विद्यार्थीनीचे संपूर्ण नाव | : ................................................................ |
| २. | महाविद्यालयाचे नाव | : ................................................................ |
| | | : ................................................................ |
| ३. | वर्तमान शैक्षणिक सत्रात प्रवेशित वर्ग | : ................................................................ |
| ४. | रक्तगट | : ................................................................ |
| ५. | शारिरीक / मानसिक तंदुरुस्ती प्रमाणपत्र जोडले | : आहे / नाही |
| ६. | बॅक खाते क्रमांक, शाखा, आइएफएससी कोड, | : खाते क्र...................... <br> : आइएफएससी कोड ...................... |
| ७. | पालकांचे संमतीपत्र जोडले | : आहे / नाही |
| ८. | पालकांच्या उत्पन्नाचा दाखला जोडला | : आहे / नाही |

विद्यार्थी / विद्यार्थीनीची स्वाक्षरी

प्रति,
संचालक,
विद्यार्थी कल्याण,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

महोदय / महोदया

विद्यापीठ अधिसुचना क्र ----------- दिनांक --------- अन्वये प्रकाशित करण्यात आलेल्या "संत गाडगेबाबा स्मृती कमवा व शिका" योजनेच्या अंतर्गत निवड होण्याकरीता आमच्या महाविद्यालयामध्ये प्रवेशित उपरोक्त विद्यार्थी / विद्यार्थीनीचा प्राप्त अर्ज पुढील कार्यवाही करीता शिफारसीसह पाठविण्यात येत आहे
दिनांक :
स्थळ :

आपला/आपली,

( प्राचार्याचा सही व शिका )

परिशिष्ट - 'ब'

# विद्यार्थी कल्याण विभाग
## कमवा आणि शिका योजना
## मोबदला मिळाल्याची पावती

पावती लिहुन देण्यात येते की, मी विद्यार्थी कल्याण विभागात चालू अंदाजपत्रकामधी बेस्ट प्रॅक्टीसेस इन युनिव्हर्सिटी या उपशिर्षामधील कमवा आणि शिका या योजनेअंतर्ग विभागामध्ये ठरवून दिलेले काम करत आहे. ठरवून दिलेली कामे पुर्ण केली असल्यामुळे मा संचालक, विद्यार्थी कल्याण विभागाकडून एकूण रु.............. (अक्षरी रुप .................................................) नगदी मिळाले.

| अ.क्र. | नियत कामाचे विवरण | नियत कामाचा दर रुपये | नियत कामाचे प्रमाण/दिवस | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |

ठिकाण -अमरावती
दि. / / २०१

सही
नांव - ..............................
पत्ता - ............................

प्रमाणित करण्यात येते की, श्री/कु. ........................ या विद्यार्थ्याने ..................... या विभागाला दि. .................ते ......................
या कालावधीत नमुद प्रमाणे कामे केलेली आहे. वरील कार्यात संबंधिताचे मदतनीस म्हणून सहकार्य प्राप्त झाले.

विभाग प्रमुख
सही शिक्का

संचालक,
विद्यार्थी कल्याण

mva aani shika/6

परिशिष्ट - 'क'

## शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती प्रमाणपत्र

प्रमाणिक करण्यात येते की, श्री/ श्रीमती -------------------------------- हा /हया शारीरीक व मानसिकरीत्या तंदुरुस्त असून तो/ ती निर्धारीत करुन देण्यात येणारे कार्य करण्यास शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम आहेत,

दिनांक :
स्थळ :

वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी

परिशिष्ट - 'ड'

## पालकांचे संमतीपत्र

मी. श्री/ श्रीमती ------------------------------------ चि./श्री/कु. ------------------------------ हयाचा /हिचा पालक/ अभिभावक असून त्याने/ तिने संत गाडगे बाबा स्मृती कमवा व शिका योजने अंतर्गत सादर केलेल्या अर्जास माझी/ आमची अनुमती आहे व तो/ती विद्यापीठ्दारे सोपविण्यात आलेली कामे शिस्त व नियमानुसार निष्पादन करेल त्याकरीता आम्ही सदर संमतीपत्र स्वाक्षरी करुन सुपूर्द करीत आहोत,

दिनांक :
स्थळ :

पालक/ अभिभावकांची स्वाक्षरी